# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१३

## श्री.आनंद विष्णू गायकवाड

### मु.दहागाव, पो.वाहोली, ता.कल्याण, जि.ठाणे



२५

- संपूर्ण क्षेत्र बागायती असून नारळ, चिकू, आंबा, पेरु, कागदी लिंबू, पपनस, पपई, तेजपत्ता इ. फळपिके व भाजीपाला पिके.
- स्वतःच्या शेतावर विकसीत केलेल्या बायोडायनॅमिक कंपोस्ट, बायोगॅस स्लरी, गाईचे मलमूत्र याचा वापर व वनस्पतीजन्य किटकनाशक म्हणून भिमसेनी कापूर, वेखंड, सिताफळ व कडूनिंब पाल्याच्या अर्काचा वापर.
- शेती व्यवसायाबरोबरच कृषि पर्यटन, कृषि सल्लागार व सेंद्रिय शेतीबाबत प्रशिक्षण देण्याचे काम .
- शाळेतील मुलांना पर्यावरण, परिसंस्था व श्रमसंस्कार यांचे महत्व पटावे म्हणून शेतावर मार्गदर्शक शिबिराचे आयोजन

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१३

## श्री.भिमराव बारकू बोरसे

### मु.पो.आमळी, ता.साक्री, जि.धुळे



२६

- स्वतःची २.२५ हेक्टर जमीन असून बायोडायनामिक कंपोस्ट, फॉस्फोकंपोस्ट घरीच तयार करुन शेतात उपयोग.
- पिक उत्पादन वाढीसाठी तसेच रोगकिडीच्या नियंत्रणासाठी एकात्मिक किड व्यवस्थापन व आंतरपिक पध्दतीचा वापर.
- व्हर्टीसिलीयम, बिव्हेरिया, ट्रायकोडर्मा आदी जैविक किडनाशके/बुरशीनाशकांचा चांगल्या प्रकारे उपयोग.
- गायीच्या ताज्या शेणापासून बायोडायनॅमिक कंपोस्ट आणि जिवामृत तयार करतात.
- कन्हैयालाल कृषक मंडळ स्थापन केले असून या मंडळाच्या माध्यमातून सेंद्रिय भात आणि नागली यांची विक्री.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१३

## श्री.सदाशिव वामनराव शेळके

## मु.मानोरी बु., पो.देशमाने, ता.येवला, जि.नाशिक



- टोमॅटो, कांदा, लसून, पपई, भाजीपाला, गहू, हरभरा, ज्वारी, कापूस, मका, बाजरी, इत्यादी पिके घेतात तसेच शेततळे खोदून विहीर पुनर्भरण केले आहे.
- स्वतःचे चैताली गांडूळ कल्चर सेंटर असून स्वतःच्या शेतात गांडूळ खताचा तसेच जिवामृत, अमृतपाणी, अमृतकण यांचा वापर.
- सुपाबायोटेक मार्फत कृषि विभागाच्या वतीने अनेक शेतक-यांकडे कंपोस्ट बेड तयार करुन घेतले.
- बीज प्रक्रियेसाठी अझोटोबॅक्टर /रायझोबियम /पीएसबी या जैविक खतांचा वापर
- सेंद्रिय शेतीचा प्रचार करण्यासाठी शेतक-यांना मार्गदर्शन.

२७

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१३

## श्री.नामदेव मारुती साबळे

### मु.भालेवाडी, पो.करंजे, ता.करमाळा, जि.सोलापूर



२८

- सोलापूर जिल्हयातील प्रगतशिल शेतकरी असून जीवामृत, गांडूळ खत निर्मिती करुन त्याचा वापर.
- पिकावरील किडींचा बंदोबस्त करण्यासाठी निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क यांचा वापर.
- सेंद्रिय पध्दतीने ऊस उत्पादन घेवून त्यापासून सेंद्रिय गुळ निर्मिती.
- बांधावर सुबाभूळ, शेवरी, चिंच, बदाम, बुच, कडूनिंब, बोर, पिंपळ, उंबर, पेरु, हादगा, तुती अशी विविध प्रकारची झाडे लावून शेळयामेंढयांना झाडपाला खाद्य तयार करुन त्याचा वापर.
- बंदिस्त शेळीपालन, खिलार गायी व म्हैसपालन, परसातील कोंबडीपालन यासारखे पूरक व्यवसाय.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१३

## सौ.शैलजा पोपटलाल नावंदर

### मु.उंबरीबाळापूर, पो.आश्वीबुद्रुक, ता.संगमनेर, जि. अहमदनगर



२१

- जिल्हयातील प्रगतशिल शेतकरी. शेतातील वाया जाणारे सेंद्रिय पदार्थ, शेतातील तण, काडीकचरा इ.शेतातच गाडून त्यापासून सेंद्रिय खत निर्निती.
- व्हर्टीसिलीयम, बिव्हेरिया, ट्रायकोडर्मा आदी जैविक किडनाशके/ बुरशीनाशकांचा उपयोग.
- कृषि विज्ञान केंद्र, प्रवरा येथील कम्युनिटी रेडिओ समितीच्या संचालिका म्हणून कार्यरत.
- शिवगौरी महिला बचत गट, उंबरी बाळापूर गटाची स्थापना करून सेंद्रिय शेतीचा प्रचार व प्रसाराचे कार्य.
- दुग्धोत्पादन वाढीसाठी आदिवासी महिलांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१३

## डॉ.श्री.प्रताप बाजीराव पाटील

### मु.पो.ऐतवडे खुर्द, ता.वाळवा, जि. सांगली



३०

- सांगली जिल्हयातील प्रगतशिल शेतकरी असून संपूर्ण क्षेत्राचे सेंद्रिय प्रमाणिकरण तसेच सेंद्रिय शेती गट तयार करुन पी. जी. एस. पध्दतीखाली प्रमाणिकरण केले.
- बायोमास उत्पादन व त्यापासून गांडूळ खत निर्मिती करुन त्याचा शेतीसाठी वापर. देशी गायीचे तूप, शेण याचा वापर व अमृतपाणी तयार करुन शेतीसाठी वापर.
- सेंद्रिय खताच्या निर्मितीबाबत इतर शेतक-यांना प्रशिक्षण.
- गेल्या ८ वर्षापासून सेंद्रिय गुळ/ गुळ पावडर, औषधी वनस्पती, तीळ, मोहरी सोयाबीन, गहू व शेंगदाणे यांचे उत्पादन करून स्थानिक तसेच परदेशी बाजारपेठेत विक्री.
- नाबार्डतर्फे बाजीराव बाळाजी पाटील शेतकरी मंडळाची स्थापना.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१३

## श्री. केदार मारोतराव जाधव

### मु.निरखेडा, पो. मौजपुरी, ता.जि.जालना



३१

- जालना जिल्हयातील प्रगतशिल शेतकरी असून त्यांच्याकडे १.२१ हे. जमीन, त्यापैकी १.०० हे. क्षेत्राचे सेंद्रिय प्रमाणिकरण.
- बायोकंपोस्ट खत, गांडूळ खत, शेणखत, काडीकचरा, हिरवळीचे खत, ताग जमिनीमध्ये गाडणे, निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क, जीवामृत व गोमूत्र इ. चा वापर.
- पिकांना पाणी देण्यासाठी ठिबक व तुषार सिंचनाचा वापर.
- शतकोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत रोपवाटिकेच्या माध्यमातून १ लाख रोपे तयार केली व मोफत वृक्ष वाटप करून पर्यावरणासाठी जनजागृती
- शेती शाळेच्या माध्यमातून इतर शेतक-यांसाठी सेंद्रिय शेतीचा प्रचार व प्रसार.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती) २०१३

## श्री.शिवदास दाजी कोरे

### मु.पो.किरमीटी मेंढा, ता.नागभीड, जि.चंद्रपूर



३२

- चंद्रपूर जिल्हयातील प्रगतशिल शेतकरी, १.७६ हेक्टर शेतजमीन असून सेंद्रिय पध्दतीने पीक उत्पादन.
- जमिनीमधील सेंद्रिय कर्ब संवर्धनासाठी हिरवळीच्या खताचा तसेच बायोगॅस स्लरीचा वापर.
- रोग व किड नियंत्रणासाठी दशपर्णी अर्क, निंबोळी अर्क, जिवामृताचा वापर.
- शेताच्या बांधावर आंबा, चिकू, पेरु, पपई, लिंबू, इत्यादी फळझाडांची लागवड.
- आकाशवाणी, विविध संघटना आणि संस्थेच्या कार्यक्रमामधून शेतक-यांना सेंद्रिय शेतीचे मार्गदर्शन.

# कृषिभूषण (सेंद्रिय शेती संस्था) २०१३

## श्री. छत्रपती शिवाजी पर्यावरण व शेती विकास प्रतिष्ठान, २०० तळमजला, नवीन बी.जे.मार्केट, जळगाव

### श्री. सोन्याबापू मुरलीधर धनाड ---- अध्यक्ष



- मागील १२ वर्षापासून सेंद्रीय शेती, पर्यावरण, पाणी व्यवस्थापन या विषयात कार्यरत, रासायनिक खताच्या वापरामुळे शेतीच्या होणा-या -हासाबद्दल जनजागृती व प्रबोधनाचे महत्वपूर्ण काम
- पाचोरा तालुक्यातील मौजे परधाडे गाव कृषि तंत्रज्ञानाच्या जागृतीसाठी दत्तक घेवून आर्ट ऑफ लिव्हींगंच्या माध्यमातून शिरपूर पॅटर्नमध्ये एकूण ३००० ट्रॅक्टर गाळ काढून पाणी साठा वाढविण्याचे काम.
- जिल्हयात व शहरात शेतकरी व महिला बचत गटांची निर्मिती करुन सेंद्रिय भाजीपाला व फळे विक्रीची साखळी निर्माण केली तसेच सेंद्रिय पध्दतीने दुधाचे उत्पादन करण्यासाठी १० शेतक-यांकडे सेंद्रिय व ए-२ प्रकारचे गाईचे गोठे निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू.
- कृषी विभागामार्फत राबविल्या जाणा-या शेतीशाळा, कार्यशाळा, कृषि प्रदर्शन, धान्य महोत्सव इत्यादी उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग .

३३